PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Jigar
Year: 1998

Song: Naynaat sangare tu majha
Lyricist: Pravin Davane

नयनात सांग रे
तू माझा होशील का
नयनात सांग रे
तू माझा होशील का
अलगुज हृदयीचे हृदयी जपशील का
अलगुज हृदयीचे हृदयी जपशील का
नयनात सांग ना
तू माझी होशील का
हे नयनात सांग ना
तू माझी होशील का
हुरहूर हृदयीची तू जाणून घेशील का
हुरहूर हृदयीची तू जाणून घेशील का
नयनात सांग रे
तू माझा होशील का

ही कहाणी वेगळी आपुल्या भेटीची
जागते आहे गुलाबी धुंदी प्रीतीची
हो उमलून आज आला सहवास लाडका
हो उमलून आज आला सहवास लाडका
ओ आतूर लोचनी तू स्वप्नच होशील का
भुलवून स्वप्नाला तू सत्यच होशील का
हो नयनात सांग रे
तू माझा होशील का

झेलली ही रात मी विरही झुरण्याची
फुलूनी आली आज ही कलिका प्रीतीची
हो हातातला कधी ना सुटणार हात हा
हातातला कधी ना सुटणार हात हा
पंखावरी तुझ्या मज अलगद नेशील का
हो तन मन हरवून हे गुंफून घेशील का
नयनात सांग ना
तू माझी होशील का
हे नयनात सांग ना
तू माझी होशील का
अल गुज हृदयीचे हृदयी जपशील का
अल गुज हृदयीचे हृदयी जपशील का
हे नयनात सांग ना
तू माझी होशील का
तू माझी होशील का
तू माझी होशील का

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*